# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ प्रकल्पाच्या नेहरू सायन्स म्युझियम येथे भुयारीकरण सुरू

■ मुंबई

मुंबई मेट्रो ३ चे नेहरू सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक आणि वरळी मेट्रो स्थानकाच्या भुयारीकरणाला नुकतीच सुरुवात झाली आहे. एमएमआरसीचे हे काम पॅकेज ३ च्या अंतर्गत असून ते नियोजित वेळेत पूर्ण होईल. या भुयारीकरणाला वापरले जाणारे टीबीएम 'तानसा-१' या मशीनची लांबी ८९ मीटर असून वजन तब्बल ४०६ मेट्रिक टन इतके आहे. नेहरू सायन्स म्युझियम ते वरळी पर्यंतचे एकूण २.२ किमी अंतरचे भुयार या



मशीनद्वारे खोदले जाणार आहे. तसेच या मार्गाचे भुयारीकरण झाल्यानंतर सायन्स म्युझियम ते मुंबई सेन्ट्रल या मार्गाचे भुयारीकरण सुरू होईल.

पॅकेज ३ चे भुयारीकरण हे प्रकल्पाचे मध्यवर्ती भुयारीकरण असून ते ठरलेल्या वेळेत यशस्वीरित्या पूर्ण होईल, असा विश्वास एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांनी व्यक्त केला. मुंबई मेट्रो ३ या संपूर्ण प्रकल्पासाठी लागणारी एकूण १७ पैकी १६ टीबीएम मशिन्स मुंबईत दाखल झाली असून सध्या १३ मशिन्स मुंबई मेट्रो ३ साठी कार्यरत आहेत.